पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/८/कावि/८६८/२०१३
दिनांक- १६/०८/२०१३

प्रति,

मा.........................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा
दिनांक २०/८/२०१३ रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक २०/८/२०१३ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ७४

दिनांक- २०.८.२०१३ वेळ - सकाळी ११.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक २०/८/२०१३ रोजी सकाळी ११.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

दिनांक १३/८/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक-७३) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्र. १) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक १०/०७/२०१३ ठराव क्र.४ नुसार, नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महिला व मुलांसाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात. त्यापैकी महिलांसाठी विविध व्यवसाय प्रशिक्षण योजना ही योजना देखिल यापुर्वी राबविण्यात आलेली आहे. सदर योजने ऐवजी महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम म्हणुन योजना राबविण्यास मान्यता देण्यात येत असुन, यापुर्वी महिलांसाठी व्यवसाय प्रशिक्षण या योजनेचे मोठया प्रमाणावरील कामकाज हे मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे या संस्थेने चांगल्या प्रकारे केलेले असल्याने तसेच विशेषकरुन पिं.चिं.म.न.पा.तील वस्तीपातळीवरील कामकाजाचा अनुभव सदर संस्थेस भरपुर असल्याने व एकुणच कार्यपध्दती व अनुभव, पुरेसे मनुष्य बळ, मोठया प्रमाणावरील कामकाज करण्यासाठी आवश्यक असलेली आर्थिक क्षमता यांचा विचार करता मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांना चालु वर्षाचे म्हणजेच दिनांक ३१/०७/२०१४ अखेरपर्यंतच्या कालावधीत महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम वस्तीपातळीवर राबविणेकामी मान्यता देण्यात येत आहे. संस्थेचे काम हे महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम आयोजित करणे हे असुन संस्थेने विषयानुरुप दिलेले दर हे फक्त त्याचसाठी जरी असले तरी महिलांच्या सबलीकरणासाठी सक्षमीकरणासाठी, त्यांच्या ज्ञान व कौशल्यात वाढ व्हावी, कौटुंबिक आर्थिक उत्पन्नात वाढ व्हावी. हा सदर योजनेचा मुख्य उद्देश असुन सदर योजनेतुन म.न.पा.स कुठलाही आर्थिक नफा मिळविणे हा हेतु नाही. मात्र संस्थेमार्फत ज्ञान कौशल्य कार्यक्रमात सहभाग घेतलेल्या महिलांना रोजगार/स्वयंरोजगारास प्रवृत्त करणे, त्यासंबंधीत व्यवसाय उभारणी ते विक्री, विक्री पश्चात सेवा तसेच जमा खर्च नोंदी, आवश्यक परवानगी/दाखले इत्यादीबाबत त्यांना मार्गदर्शन करणे बंधनकारक राहील. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील १६ वर्षे पुर्ण असणा-या महिला/मुलींना वास्तव्यार्थ /वयाचा पुरावा म्हणुन आधारकार्ड /मतदान ओळखपत्र /पॅनकार्ड/

रेशनकार्ड इत्यादी तत्सम कागदपत्र स्वीकारुन कुठल्याही उत्पन्न गटातील महिला /मुलींना कार्यक्रमास विषयानुरुप एकुण शुल्काच्या १० **%** रक्कम ही लाभार्थी सहभाग शुल्क म्हणुन भरुन घेऊन ३० महिलांच्या मर्यादेत गटप्रमुखांमार्फत फाईल सादर करुन कार्यक्रमात सहभागी करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सदर योजने अंतर्गत महिलांसाठी वस्तीपातळीवर महिला गटांच्या मागणीनुसार व वेळेत सदर कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे असुन,विषयानुरुप निश्चीत केलेल्या एकुण शुल्काच्या १०**%** रक्कम भरुन, यापुर्वी व्यवसाय प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेतलेले असले तरी एक किंवा एकापेक्षा अधिक विषयांच्या सदर ज्ञान व कौशल्य कार्यक्रमात महिला / मुलींना सहभागी करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे. विषयानुरुप अभ्यासक्रम पाहुनच व तो आपल्याला झेपेल याची खात्री वाटणा-या म्हणजेच तो कोर्स करण्याचे ज्ञान/कुवत/क्षमता असलेल्या गरजु महिलाच सहभाग शुल्क भरुन फाईल सादर करीत असतात. त्यामुळे विशिष्ट अशा शैक्षणिक अर्हतेच्या अटीची आवश्यकता नाही. त्यामुळे महिलांना त्यांचे इच्छेनुरुप ज्ञान कौशल्य कार्यक्रमास सहभागी होणेपासुन वंचित ठेवले/राहिले असे होणार नाही, केवळ शैक्षणिक अर्हतेतुन ज्ञानाची पातळी कळुन येत नाही. त्यामुळे कुठलीही गरजु / इच्छुक महिला ज्ञान कौशल्य कार्यक्रमापासुन वंचित राहु नये, कार्यक्रमात सहभागी करुन घेत नाही अशा कुठल्याही प्रकारच्या तक्रारीस वाव राहु नये, या हेतुने कुठलीही/विशिष्ट शैक्षणिक अर्हता न ठेवता ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये दिलेले विषय, कालावधी व दर यांस व प्रपत्र ब नुसार सदरची योजना मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचेमार्फत दि. ३१/७/२०१४ अखेरपर्यंतच्या कालावधीत विषयानुरुप एकुण कार्यक्रम शुल्काच्या १०% रक्कम ही लाभार्थी सहभाग शुल्क म्हणुन भरुन घेऊन महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रमात लाभार्थ्यांना सहभागी करुन घेऊन योजना राबविणेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे**

**महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम**

**प्रपत्र – अ**

| अ.क्र | विषयाचे नाव | कार्यक्रम कालावधी (दररोज २ तास) | एकुण शुल्क | लाभार्थी १०% सहभाग शुल्क |
|---|---|---|---|---|
| १ | स्पोकन इंग्लिश | ३० दिवस | ३,०००/- | ३००/- |
| २ | विक्री कलाकौशल्य (मॉल इ.) | ३० दिवस | ३,०००/- | ३००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | अडव्हान्स गिफ्ट आर्टीकल्स निर्मिती (केमिकल फ्लॉवर,सिरॅमिक फ्लॉवर पॉट, ग्लास पेंटींग, स्टेन ग्लास पेंटींग, फ्रेमिंग, पोस्टर फ्रेमिंग इ.) | ३० दिवस | ३,०००/- | ३००/- |
| ४ | मोबाईल रिपेअरींग | ४५ दिवस | ३,१५०/- | ३१५/- |
| ५ | ब्युटी केअर ऍण्ड पार्लर मॅनेजमेंट | ६० दिवस | ४,५००/- | ४५०/- |
| ६ | फोटोग्राफी | ३० दिवस | ३,६००/- | ३६०/- |
| ७ | पेपर कन्व्हर्जन | ६० दिवस | ३,०००/- | ३००/- |
| ८ | घरगुती उपकरणे दुरुस्ती (मिक्सर/इस्त्री/गॅस/फॅन इ.) | ३० दिवस | ४,१५०/- | ४१५/- |
| ९ | विविध प्रकारचे खाद्य पदार्थ तयार करणे | ३० दिवस | ३,०००/- | ३००/- |
| १० | व्हीडीओ शुटींग | ३० दिवस | ३,७००/- | ३७०/- |
| ११ | प्ले ग्रुप टिचर्स प्रशिक्षण | ३० दिवस | ३,०००/- | ३००/- |
| १२ | रुग्ण सेविका प्रशिक्षण | ३० दिवस | ३,०००/- | ३००/- |

(दिनांक २०/८/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र. २) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२८/२०१२-१३ मधील अ.क्र.२ अन्वये, ड प्रभागातील उद्यानाचे स्थापत्य व उद्यान विषयक नुतनीकरणाची कामे करणेकामी मे.दृष्टी कन्स्ट्रक्शन (नि.र.रु. १,१७,७३,३२०/- (अक्षरी र.रु.एक कोटी सतरा लाख त्र्याहत्तर हजार तीनशे वीस) पेक्षा १५.९९ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१,०३,८५,३०४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे बाजारभावानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २०/८/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र. ३) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२८/२०१२-१३ मधिल अ.क्र.१ अन्वये, स.नं.१० सांगवी येथील संत गोरा कुंभार उद्यानाचे नुतनीकरण करणे कामी मे.रिगल कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.१५,८६,९१६/- (अक्षरी र.रु.पंधरा लाख शहाऐंशी हजार नऊशे सोळा) पेक्षा १५.०० % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१४,१६,३२३/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे बाजारभाव कलमानुसार

मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

(दिनांक २०/८/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र. ४) उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.९/२/२००९-१० नुसार ड प्रभागातील मनपाचे विविध उद्याने देखभाल व संरक्षण करणेकामी ३ (तीन) वर्ष कालावधीनुसार उर्वरीत र.रू.१२,५७,७२४/- (मे २०१३ अखेर) चे प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर व पुढील निविदा प्रकीया अंतीम होई पर्यंतच्या मुदतवाढ कालावधीत होणा-या प्रत्यक्षात खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २०/८/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र. ५) उद्यान विभागाकडील नि.क्र.९/१-२००९/१० ब प्रभागातील मनपाचे विविध उद्याने देखभाल व संरक्षण करणेकामी ३ (तीन) वर्ष कालावधीनुसार उर्वरीत र.रू.३४,३६,९२३/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता व पुढील निविदा प्रक्रिया अंतीम होई पर्यंतच्या मुदतवाढ कालावधीत येणारे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २०/८/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र. ६) उद्यान विभागाकडील नि.क्र.१/(१-अ)२००९/१० अ प्रभागातील मनपाचे विविध उद्याने देखभाल व संरक्षण करणेकामी ३ (तीन) वर्ष कालावधीनुसार उर्वरीत र.रू.८७,२३,८४८/- (मे २०१३ अखेर) चे खर्चास कार्योत्तर व पुढील निविदा प्रक्रिया अंतीम होई पर्यंतच्या मुदतवाढ कालावधीतील प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २०/८/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र. ७) मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१७/२०१२-१३ मधील अ.क्र.५ अन्वये, जलशुध्दीकरण केंद्र से.२३ टप्पा-३ व ४ मध्ये प्रकाश व्यवस्था व विद्युत विषयक कामे करणेकामी मे.एम.बी.इलेक्ट्रीक & कंपनी (नि.र.रु.३२,७७,०२९/- (अक्षरी र.रु.बत्तीस लाख सत्याहत्तर हजार एकोणतीस) पेक्षा (सुधारीत दर) १२.३५ % कमी) या ठेकेदाराबरोबर वरील कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २०/८/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र. ८) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.६/४२/२०१२-१३ मधील अ.क्र.१९ अन्वये, पिंपरी चिंचवड शहरातील उर्वरीत उंच टाक्या SCADA SYSTEM शी जोडणे कामी मे.रेक्ट्रॉनिक डिव्हायसेस अँण्ड सिस्टिम्स (नि.र.रु.४,५६,८६,५६६/- (अक्षरी र.रु.चार कोटी छपन्न लाख शहाऐंशी हजार पाचशे सहासष्ट) पेक्षा १३.०० % कमी) या ठेकेदाराबरोबर वरील कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २०/८/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.९) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.अ मुख्यालय/HO/१४/२०१२-१३ मधील अ.क्र.०६ अन्वये, प्रभाग क्र.३ चिखली मोरेवस्ती मधील चिखली आकुर्डी रस्त्यापासून तळवडे रस्त्याला जोडणारा अंतर्गत मुख्य रस्ता विकसीत करणे कामी मे.क्लिन्सी कंन्स्ट्रक्शन

प्रा.लि. पुणे (नि.र.रु.२,८०,११,२०४/- (अक्षरी र.रु. दोन कोटी ऐंशी लाख अकरा हजार दोनशे चार) पेक्षा (सुधारित दर) ५.००% जास्त) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.२,९४,११,७६४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेमधील निविदा अटी प्रमाणे डांबर मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २०/८/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.१०) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे वापरासाठी खरेदी करणेत येणारे रोड स्विपर मशिन मे.बी.व्ही.जी.इंडीया लि., चिंचवड, पुणे-१९. यांचे निविदेतील भाग-०२ कामामधील दर सर्वात कमी असल्याने त्यांचेकडून एकत्रितपणे करारनामा करून घेऊन सदर मशिन चालनाकरिता प्रति दिन प्रति शिफ्ट र.रू.९,२२५/- (र.रू.नऊ हजार दोनशे पंचवीस) अधिक वेळोवेळी होणा-या बदलानुसार येणारे सेवाकर याप्रमाणे येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २०/८/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.११) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२८/२०१२-१३ मधील अ.क्र.१२ अन्वये, ड प्रभाग क्षेत्रातील मोकळ्या जागाना सिमाभिंत बांधणे व स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणेकामी मे.यशक असोसिएट्स (नि.र.रु. ८४,०२,१२९/- (अक्षरी र.रु.चौ-याऐंशी लाख दोन हजार एकशे एकोणतीस) पेक्षा १५.७६ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.७४,३१,८५१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे बाजारभावानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २०/८/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.१२) नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजूरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१३) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी कडील सन २०१२-१३ च्या सुधारित अंदाजपत्रकात बोनस तथा सानुग्रह अनुदान ह्या लेखाशिर्षावर र.रू.९०,०००/- (र.रू.नव्वद हजार) कमी घेणेत आली असल्याने तरतूदी मध्ये तफावत दिसत असून सुधारित तरतूदी पेक्षा र.रू.८४,१८९/- इतका जादा खर्च झालेला आहे. सदरची तफावत दुरुस्त करणेकामी स्थायी आस्थापनेवर दिनांक २०/३/२०१३ रोजी एकूण र.रू.२,०६,४८८/- शिल्लक आहे. सदर रकमेतून र.रू.९०,०००/- फक्त सन २०१२-१३ च्या बोनस तथा सानुग्रह अनुदान या लेखाशिर्षावर तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१४) कनिष्ठ अभियंता, स्थापत्य पदासाठी घेणेत येणा-या लेखी स्पर्धा परीक्षेकरिता मे.झील टेक् सर्व्हीसेस, कोथरुड, पुणे यांचेकडून ओएमआर उत्तरपत्रिका छपाई करुन घेणेस तसेच मशीनवर उत्तरपत्रिका तपासणीचे काम थेट पध्दतीने करुन घेणेस व त्याकरिता येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे. (अंदाजे खर्च र.रू.६,४९१/-)

विषय क्र.१५) मनपाच्या स्थापत्य वाहतूक विभागाकडील नि.नो.क्र.२६/२०१३-१४ मधिल अ.क्र.२४ अन्वये, चिंचवडगांव वाल्हेकरवाडी आंबेडकर चौक पिंपरी किवळे बस टर्मिनलच्या परिसरात प्रवाशांना/नागरीकांना सुरक्षित रस्ता ओलंडणेच्या सुविधा तयार करणेकामी मे.एस.एम.कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.९,३३,७०७/- (अक्षरी र.रु. नऊ लाख तेहतीस हजार सातशे सात) पेक्षा ३३.२३ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.६,५४,६०८/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१६) महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.८.०७.२०१३ ते १४.०७.२०१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/१/कावि/७०/२०१३ दि.१२.८.२०१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्र.१७) महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१५.०७.२०१३ ते २१.०७.२०१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/१/कावि/७१/२०१३ दि.१२.८.२०१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्र.१८) महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२२.०७.२०१३ ते २८.०७.२०१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/१/कावि/७२/२०१३ दि.१२.८.२०१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्र.१९) नागरी सुविधा केंद्राचे कामकाजाची पाहणीसाठी मा. अति.आयुक्त, सहा.आयुक्त करसंकलन व संगणक अधिकारी यांच्या समवेत हैद्राबाद व बेंगलोर तसेच प्रभाग क्र. ३५ अ मधील श्रीम.सिमा फुगे नगरसदस्या अनर्हता प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे जाणेसाठी विमान प्रवासकामी झालेल्या र.रु. ४००७३/- खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२०) श्री.भोसले विनायक बाबुराव, रखवालदार यांच्या अपिल अर्जावर विचार करणे.
(मा.स्थायी समिती ठराव क्र.३६२२ दिनांक ९/७/२०१३ अन्वये)

विषय क्र.२१) जागतिक बँकेच्या सहाय्याने सुरू असलेल्या SUTP प्रकल्पा अंतर्गत Technical Assistance (T.A.) मधील Parking Policy & Master Plan साठी UMTC, New Delhi यांनी दिलेली लघुत्तम

दराची निविदा र.रू.५५,७६,६००/- (र.रू.पंचावन्न लाख शहात्तर हजार सहाशे) + सेवा कर (Service Tax) व इतर स्विकारण्यास व त्यांच्याशी करारनामा करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२२) अभिलेख कक्षाचे कामकाज करण्यासाठी श्री.ए.ए.शेख, सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांना दिनांक १/९/२०१३ पासून सहा महिने कालावधीसाठी दरमहा र.रु.२०,०००/- इतक्या एकत्रित मानधनावर नियुक्तीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२३) मा.क्रिडा समिती सभा दिनांक १२/०८/२०१३ ठराव क्र.२४ नुसार, शासकीय जिल्हास्तर शालेय ५० खेळ प्रकारांच्या क्रीडा स्पर्धा २०१३-१४ आयोजित करणेस व स्पर्धेकामी पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, पंच मानधन, पंच चहा-अल्पोपहार खर्च, नारळ, बुके, पुजा खर्च, स्टेशनरी खर्च, साहित्य भाडेपोटी खर्च, प्रेक्षागृह भाडे इतर खर्च इ. सन २०१३-१४ मध्ये विभागीयस्तर स्पर्धेसाठी म.न.पा.शाळेतील अंदाजे ३०० विद्यार्थी खेळाडू व राज्य पातळीवर १५०, राष्ट्रीय पातळीवर ५० व संघटनेमार्फत आयोजित क्रीडा स्पर्धेसाठी ५० शालेय खेळाडू, त्याच्या समवेत जाणारे क्रीडा शिक्षक व व्यवस्थापक यांचे प्रवासखर्च, दैनिक भत्ता, प्रवेश फी, औषध खर्च इ. अदा करणेकामी अंदाजे र.रु.१,००,०००/- असे एकूण येणा-या संभाव्य खर्च र.रु.९,८८,८००/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च क्रीडा निधी - वार्षिक क्रीडा स्पर्धा, क्रीडा कला साहित्य या लेखाशिर्षावर केलेल्या एकूण तरतूद र.रु.३५,००,०००/- मधून खर्ची टाकणेस तसेच शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडास्पर्धा अनुषंगाने मंडप, बैठक व्यवस्था, ध्वनी / विद्युत व्यवस्था, मैदान तयार करणे व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे इ. स्वरुपाचा खर्च हा प्रभाग कार्यालयामार्फत होणार आहे. त्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च प्रभागाचे अंदाजपत्रकातून खर्ची टाकण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/८/कावि/८६८/२०१३
दिनांक- १६/०८/२०१३

टिप- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.